प्रकरण - तिसरे

सांगली जिल्ह्यातील पूर आपत्ती व्यवस्थापकीय यंत्रणांचे कार्य आणि मूल्यांकन

प्रकरण - तिसरे

सांगली जिल्ह्यातील पूर आपत्ती व्यवस्थापकीय यंत्रणांचे कार्य आणि मूल्यांकन

प्रस्तावना -

प्रस्तुत प्रकरणात भारतातील अतिवृष्टी आणि इतर अनुषंगीक आपत्तीचे स्थूल चित्रण मांडून सांगली जिल्ह्याची संक्षिप्त माहिती देऊन जिल्हास्तरीय पूरनियंत्रण प्रशासकीय यंत्रणेचे अधिकारी वर्ग आणि त्यांचे कार्य व कार्यक्षेत्राबद्दल माहिती मांडलेली आहे. याशिवाय पूरनियंत्रणाविषयी आणि पूराच्या संदर्भात त्यांचे मते या प्रकरणात मांडली आहेत.

भारतामध्ये गोदावरी, कृष्णा कावेरी या दक्षिण नद्यांच्या त्रिभूज प्रदेशात तसेच गंगा नदीच्या खोऱ्यामध्ये पूर व्यवस्थापन करण्यात आले आहे. भारतात १५७६४ कि.मी. चे पूर तट, ३१३८८ कि.मी. चे सिंचनाचे कालवे तयार केले आहेत. जवळपास ९०० पेक्षा जास्त गावांना आणि ४७५० खेड्यांना पूरापासून सुरक्षित व्यवस्थापन करण्यात आले आहे. साधारणत: १४.०८ लाख हेक्टर क्षेत्राला पूर व्यवस्थापनामुळे फायदा मिळाला आहे.[१]

पंचावार्षिक योजनेमध्ये नैसर्गिक आपत्तीचे व्यवस्थापन व प्रतिबंध यासंबंधी घटक विचारात घेतले. आपत्ती निवारणाचा पारंपारिक दृष्टीकोन मर्यादित होता. की, जो योजनेत्तर खर्च म्हणून पाहिला गेला. तथापि आपत्तीचे परिणाम तात्काळ मदतीच्या तरतुदीद्वारे सोडविले जाऊ शकत नव्हते. आपत्ती अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम करतात. त्यामुळे मानवी व आर्थिक साधनसंपत्तीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. त्यामुळे आज देशासमोर फार मोठे आर्थिक संकट निर्माण होत असताना पहावयास मिळते. त्यामुळे भारत सरकार आणि घटक राज्याकडून आपत्ती व्यवस्थापन विषयक नियोजन करण्यात आले आहे.[२] भारतातील अतिवृष्टी, दरडी कोसळणे आणि पूरातून झालेल्या नुकसानीबद्दल माहिती खालील तक्ता क्र. ३.१ मध्ये दिलेली आहे.

तक्ता क्र. ३.१

अतिवृष्टी, दरडी कोसळणे व महापूर यामुळे झालेले वार्षिक नुकसान

अ.नं.	वर्ष	बाधित जिल्हे	बाधित गांवे	बाधित लोकसंख्या (लाख)	बाधित पीकक्षेत्र (लाख हेक्टर)	पडलेली घरे	मानवी जीवितहानी	प्राणी जीवितहानी	पडीत घरांची किंमत (कोटी रू.)	सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान (कोटी रू.)
१	१९९९	२०२	३३.१५८	३२८.१२	८.४५	८८४.८२३	१.३७५	३.८६१	०.७२	--
२	२०००	२००	२९.९६४	४१६.२४	३४.७९	२.७३६.३५५	३.०४८	१०२.१२१	६३१.२५	३८९.७२
३	२००१	१२२	३२.३६३	२१०.७१	१८.७२	३४८.८७८	८३४	२१.२६९	१९५.५७	६७६.०५

Source : Annual reports National Disaster Management Division Ministry Agriculture, 2002-07, Page No. 193.

तक्ता क्र. ३.१ वरून असे निदर्शनास येते की, अलिकडच्या काळात म्हणजे १९९९ पासून २००१ पर्यंत पुरामुळे सर्व घटकांच्या नुकसानीचे प्रमाण वाढत आहे हे स्पष्ट होते.

भारतामध्ये भौतिक आणि नैसर्गिक गोष्टीचा विचार करून अनेक पातळीवरती आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा राबविण्यात येते. वेगवेगळ्या प्रकारची आपत्ती घडत असतात तेव्हा आपत्तीमध्ये बाधीत झालेल्या लोकांच्यासाठी सर्व यंत्रणा आपापल्या परीने काम करीत असतात यामध्ये माणूसकीचा चेहरा महत्त्वाचा असतो. आपत्ती व्यवस्थापनाचा थेट संबंध मानवी जीवनाशी येतो. प्रशासकीय कार्य मग ते खाजगी असो अथवा सार्वजनिक असो तेथे संघटन हा घटक महत्त्वाचा ठरतो. अशा संघटनेसंबंधी काही व्याख्या पाहणे इष्ट ठरते. त्या पुढील प्रमाणे-

१) हर्बट सायमन : "संघटन म्हणजे सामूहिक कार्याची अशी योजनाबद्ध व्यवस्था की ज्यामध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस निश्चित अशी भूमिका असून त्यानुसार कर्तव्ये व कार्ये पार पाडावी लागतात."[३]

२) टॉलकॉट पार्सन्स : "एखादे विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मुद्दामहून जाणीवपूर्वक निर्माण केल्या जाणाऱ्या मानवी समुहास संघटना असे म्हणतात."[४]

वरील विविध व्याख्यांचा आशय विचारात घेता असे म्हणता येईल की, सामुहिक प्रयत्नाद्वारे एखादा विशिष्ट हेतू साध्य करण्यासाठी जी रचना किंवा यंत्रणा निर्माण करावी लागते त्या रचनेला संघटना असे म्हणतात. आपत्ती व्यवस्थापनात केंद्र याचा उद्देश नैसर्गिक आपत्तीमध्ये मानव व आर्थिक हानी होणार नाही याची दक्षात घेतली जाते. यात प्रामुख्याने मनुष्य हा केंद्रबिंदू मानला जातो. कोणतीही संघटना निर्माण करताना पुढील तत्त्वांचा विचार करावा लागतो. ती पुढील प्रमाणे आहेत.

उद्देश (हेतू), प्रक्रिया, प्रजा, प्रदेश या व्यतिरिक्त उरलेली तत्त्वे पोषक तत्त्वे असून त्याच्या मदतीने संघटना उद्दिष्टे साध्य करतात. यासाठी व्यवस्थापन हा घटक देखील फार महत्त्वाचा आहे.

व्याख्या :

जॉर्ज टेरी :

"व्यवस्थापन म्हणजे (संघटनेतील) इतर लोकांच्या प्रयत्नातून पूर्वनिश्चित उद्दिष्टे साध्य करणे होय."[५] व्यवस्थापन हे एक शास्त्र आहे. व्यवस्थापन शास्त्राची आधुनिक संकल्पना मनुष्य बळाची अधिक समर्पक व क्रियाशील वापर अधोरेखीत करते. तसेच लोकांच्या आंतरसंबंधाना औपचारिक स्थान प्राप्त करून देते. आपत्ती व्यवस्थापन सर्वात महत्त्वाचा भाग मानवीय संवेदनाचा आणि संवादाचा असतो. उदा. महापूर, भूकंप, त्सुनामी, अशा आपत्ती घडतात त्यावेळी सर्व प्रकारचे व्यवस्थापन राबविणे म्हणजे एक दिव्यच असते.

आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण :

'राष्ट्रीय आपत्ती निवारण अधिनियम २००५ अनुरूप राज्यशासनाने आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना केली आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री हे राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अनुक्रमे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष आहेत. प्रत्येक जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची (डी.डी.एम.ए.) स्थापना करण्यात आली आहे. संबंधीत जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषद अध्यक्ष आणि उपाध्यक्ष असणार आहेत.[६]

महाराष्ट्र शासनाने आपत्ती व्यवस्थापन मंडळाची स्थापना करून प्रत्येक जिल्ह्यानुसार कृती समिती स्थापन करण्यात आली. प्रशासकीय अधिकारी वर्ग आणि त्यांच्या कार्याचे क्षेत्र खालील प्रमाणे देण्यात आले आहे.

तक्ता क्र. ३.२

प्रशासकीय अधिकारी वर्ग व त्यांचे कार्यक्षेत्र

क्र.	प्रशासकीय अधिकारी	कार्यक्षेत्र
१	विभागीय आयुक्त	विभाग
२	जिल्हाधिकारी	जिल्हा
३	प्रांताधिकारी	काही तालुके
४	तहसिलदार	तालुका
५	सर्कल ऑफीसर	तालुक्यातील विभाग
६	तलाठी	एका पेक्षा अधिक गांवे
७	कोतवाल	तलाठ्याला सहकार्य करणे

संदर्भ - जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली - २००७

तक्ता क्र. ३.२ वरून प्रत्येक विभागासाठी एक विभागीय आयुक्ताची नेमणुक करण्यात येते. जिल्हा स्तरावर प्रशासकीय व व्यवस्थापन कार्य पाहण्यासाठी जिल्हाधिकारी यांची निवड केली जाते. तालुका स्तरावर तहसिलदार आणि तालुक्यातील विभागीय स्तरावर सर्कल ऑफीसर, तसेच एका पेक्षा जास्त गांवाचे प्रशासकीय कामकाज पाहण्यासाठी तलाठी आणि तलाठीला मदत करण्यासाठी गावपातळीवर कोतवाल अशा अधिकाऱ्यांच्या नेमणूकीद्वारे प्रशासकीय कामकाज सुलभ रितीने पार पाडले जाते.

सांगली जिल्हा - एक दृष्टिक्षेप :

महाराष्ट्राच्या पश्चिम पठारी भागावर वसलेला सांगली जिल्हा १६° ४५° उत्तर अक्षांश ते १७° ३३° उत्तर अक्षांश आणि ७३° ४२° ते ७५° ४०° पूर्व रेखांश यामध्ये आहे. सांगली जिल्हा सातारा जिल्ह्यात विलिनीकरण करण्यात आला. १९४५ साली सातारा जिल्ह्याचे दोन भागामध्ये विभागणी करण्यात आली. दक्षिण सातारा आणि उत्तर सातारा, २१ नोव्हेंबर १९६० रोजी दक्षिण साताऱ्याचे सांगली जिल्हा असे नामकरण करण्यात आले. आज पुणे विभागामध्ये सांगली जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे.[७] जिल्ह्याच्या सीमेलगत सोलापूर, सातारा, कोल्हापूर, कर्नाटकचा थोडासा भाग अशी सीमा आहे. तसेच सांगली जिल्ह्यातून कृष्णा नदी वाहते. सांगली जिल्ह्याची संक्षिप्त माहिती खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

सांगली जिल्हा


SANGLI
(Maharashtra)
N
SATARA
SOLAPUR
KOLHAPUR
Karnataka
Dighanchi
Atpadi
Nagewadi
Kharasundi
Hanmant Vadiye
Khanapur
Vite
Kadegaon
To Musur
To Karad
To Sangole
Huljanti
Umadi
Krishna
Kundal
Visapur
Nagaj
Kasegaon
Borgaon
Palus
Nerla
Sawlaj
Islampur
Peth
Shirala
Valva
Tasgaon
Mancrajuri
Kavathe Mahankal
Ankle
Jath
Karajagi
Kameri
Adumbar
Ashta
Bhilavdi
Ranjini
Bhose
Bagni
Kavathe Piran
Bhudgaon
Sundewadi
Bilur
Dudhgaon
SANGLI
Malgaon
Arag
To Kolhapur
(District Headquarter)
Miraj
Bedag
To Shedbal(Karnataka)
District Boundary
River
National Highway
Major Road
Road
Railway Track
District Headquarter
Taluk Headquarter
Town
Tourist Places
Map not to scale
Copyright © 2006 Computer Infobase Pvt. Ltd

तक्ता क्र. ३.३
सांगली जिल्ह्याची माहिती

क्र.	एकूण माहिती (नांवे)	एकूण आकडेवारी
१	क्षेत्रफळ	८५६२ चौ.किमी.
२	एकूण लोकसंख्या	२५८४००० लाख
३	शहरी लोकसंख्या	६३४००० लाख
४	ग्रामीण लोकसंख्या	१९५००० लाख
५	स्त्री-पुरूष प्रमाण	९५७
६	लोकसंख्येची घनता	३०१ दर चौ.किमी.
७	साक्षरतेचे प्रमाण	७६.७९ टक्के
८	प्रशासकीय विभाग	०३
९	मुख्य शहरे	०३
१०	महानगरपालिका	०१
११	नगरपालिका	०४
१२	तालुके	१०
१३	पंचायत समिती	०९
१४	ग्रामपंचायत	७०५
१५	एकूण पिकाखालील क्षेत्र	७२१००० हेक्टर
१६	लागवडीखालील क्षेत्र	१५६००० हेक्टर
१७	वार्षिक सरासरी पर्जन्यमान	७८० मि.मी.

Source : N. S. Gaikwad – "Production and Marketing of Raisins in Sangli District", Ph.D., April-2007, Shivaj University, Kolhapur

तक्ता क्र. ३.३ प्रमाणे सन २००१ च्या जनगणनेनुसार सांगली जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ८५६२ चौ.कि.मी. असून, एकूण लोकसंख्या २५,८४,०० इतकी होती.

जिल्ह्यात स्त्री-पुरूष प्रमाण ९५७, लोकसंख्येची घनता ३०१ चौ.कि.मी. इतकी आहे. साक्षरतेचे प्रमाण ७६.७९ टक्के इतक्या प्रमाणात आहे. प्रशासकीय कामकाज योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी ०३ विभागामध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे. सांगली जिल्ह्यामध्ये मुख्य शहरे ३ आहेत, १ महानगरपालिका, त्याचप्रमाणे ४ नगरपालिका, १० तालुके, ९ पंचायत समिती आणि ७०५ ग्रामपंचायत आहेत. अशा प्रकारे प्रशासकीय घटकात विभागणी करण्यात आली आहे.

जिल्ह्यात पीकाखालील एकूण क्षेत्र ७२१००० हेक्टर इतके आहे. त्यामध्ये लागवडीखालील एकूण क्षेत्र १५६००० हेक्टर आहे. जिल्ह्यामध्ये वार्षिक सरासरी प्रर्जन्यमान ७८० मि.मी. आहे.[८]

सांगली जिल्ह्यातील पूरआपत्ती व्यवस्थापकीय यंत्रणांचे कार्य :

आपत्कालीन परिस्थिती एखाद्या तालुक्यापुरती मर्यादीत असेल. तर स्थानिक पातळीवर प्रयत्न करून, तालुका स्तरावरील आराखड्याप्रमाणे काम करून त्याची तीव्रता कमी करता येते. परंतु संपूर्ण जिल्ह्यामध्ये आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास जिल्हा आपत्कालीन आराखड्याप्रमाणे सर्व संबंधीत खात्याशी समन्वय साधुन त्यावर मात करणे आवश्यक आहे.

जेव्हा एकापेक्षा अधिक तालुके आपत्तीमुळे बाधीत होतात अशा वेळी जिल्हा नियंत्रण कक्ष हा समन्वय साधणार घटक असतो. तहसिलदार हे तालुकास्तरावरील इतर कार्यालयाशी उदा. गट विकास अधिकारी, यांच्याशी समन्वय साधुन कामकाज करेल अशी अपेक्षा असते. सदर शोध निबंधात अध्ययनासाठी घेतलेल्या दोन्ही गांवे एकाच तालुक्यातील असल्यामुळे पूरपरिस्थितीशी निगडीत असलेल्या प्रमुख शासकीय खात्याच्या अधिकाऱ्यांचे कार्य व अंमलबजावणीबद्दल विवेचन मर्यादीत केलेले आहे.

तहसिलदार यांची कार्ये :

आपत्तीची सुचना मिळताच तहसिलदार यांनी पूर्व तयारी म्हणून खालील गोष्टीची तयार करणे आवश्यक आहे.

तालुका नियंत्रण कक्षाची स्थापना करणे, तालुका नियंत्रण कक्षाची स्थापना करताना, त्यामध्ये खालील गोष्टींचा अंतर्भाव करणे आवश्यक आहे.

१) जिल्हा नियंत्रण कक्षाशी दुरध्वनीद्वारे थेट संपर्क साधणे.

२) नायब तहसिलदार दर्जाचा अधिकारी नियंत्रण कक्षाचा प्रमुख असावा.

३) आवश्यक असणाऱ्या वस्तू खालीलप्रमाणे तयार ठेवाव्यात. बोटी, ट्रक, पाण्यामध्ये वापरता येणाऱ्या बॅटऱ्या, रात्री वापरता येणाऱ्या बॅटऱ्या, खाणकामासाठी आवश्यक असणारे साहित्य, जाड स्वरूपाचे दोर, झाडे कापण्याच्या करवती, मेगा फोन, गॅस कटर्स, जे.सी.बी. कटर्स, जनरेटर्स, एल.पी.जी., प्रथमोचाराचे साहित्य.

४) तालुका तहसिलदार यांनी तालुक्यामधील विविध खात्यांच्या कामकाजामध्ये समन्वय राखण्याची कार्य पार पाडावे. तसेच त्यांनी सर्व खात्यांना आवश्यक ती मदत तात्काळ पुरवावी, जेणे करून त्यांना पूर्ण क्षमतेने काम करता येईल.

५) घटनास्थळावरून तहसिलदार यांनी जिल्हा नियंत्रण कक्षाशी व क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी खालील माध्यमाद्वारे कायमस्वरूपी संपर्कात असणे आवश्यक आहे.

अ) पोलीस (कायदा व सुव्यवस्था) — पोलीस निरीक्षक,

ब) अग्निशमन दल — मुख्य अधिकारी

क) एस.टी. (वाहतूक) — मुख्य वाहतूक अधिकारी)

ड) सरकारी दवाखाना — वैद्यकीय अधिकारी व प्राथमिक आरोग्य केंद्र

इ) बी.एस.एन.एल. — एक्स्चेंज

आपत्कालीन परिस्थितीमध्ये काम करणारे कर्मचारी व स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांना सहजरित्या ओळखता यावे म्हणून त्याना विशिष्ट खूण असणारे बॅचेस देण्यात आल्याची तहसिलदार यांनी खात्री करणे आवश्यक आहे. तसेच तालुका स्तरावरील आपत्कालीन आराखड्या मधील सर्व माहिती इतर सर्व खात्याच्या क्षेत्रीय स्तरावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना देण्याची कार्ये तहसिलदार यांची राहिल.[९]

उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्ये :

आपत्ती काळात सुचना मिळताच उपअभियंता यांनी पुर्वतयारी म्हणून खालील कार्ये पार पाडणे आवश्यक आहे.

15231

१) आपत्तीच्या वेळी झाड पडणे किंवा दरड कोसळण्यामुळे रहदारीस अडथळा होवू नये याची पुर्व तयारी म्हणून जे.सी.बी. व झाडे कापण्यासाठी करवती तयार ठेवणे.

२) आपत्तीच्या वेळी घरांच्या पडझडीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून त्याचे मुल्य ठरविणे.

३) आपत्तीच्या काळात बाधीत झालेल्या लोकांना राहण्यासाठी तात्पुरते निवारे उभारण्यासाठी तहसिलदार व गट विकास अधिकारी यांना आवश्यक ती मदत करणे.

४) बाधीत क्षेत्रामध्ये घडणाऱ्या घटना तसेच नेमणुक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यां विषयी संबंधीत नियंत्रण कक्षास माहिती देणे व अतिरिक्त मदतीबाबत कळविणे.[१०]

उपअभियंता पाटबंधारे विभागाचे कार्ये :

आपत्ती काळात सुचना मिळताच उपअभियंता यांनी पुर्वतयारी म्हणून खालील कार्ये पार पाडणे आवश्यक आहे.

१) आपत्तीची सुचना मिळताच उपअभियंता पाटबंधारे विभाग यांनी सातत्याने धरणाच्या पाणी पातळीवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

२) धरणामध्ये येणाऱ्या पाण्याची व धरणातुन सोडण्यात येणाऱ्या पाण्याची माहिती तालुका नियंत्रण कक्षास प्रत्येक तासाला कळविणे आवश्यक आहे.

३) धरणातुन जास्त पाणी सोडणे आवश्यक असल्यास, नदीकाठच्या गावांना व तालुका नियंत्रण कक्षास तसे कळविणे आवश्यक आहे.

४) बाधीत क्षेत्रामध्ये घडणाऱ्या घटना तसेच नेमणुक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यां विषयी संबंधीत नियंत्रण कक्षास माहिती देणे व अतिरिक्त मदतीबाबत कळविणे.[११]

एस.टी. व्यवस्थापकाचे कार्ये :

आपत्ती काळात सुचना मिळताच एस.टी. व्यवस्थापक यांनी पुर्वतयारी म्हणून खालील कार्ये पार पाडणे आवश्यक आहे.

१) वाहतुकीसाठी राखीव बसेस तयार ठेवणे.

२) रेल्वे व्यवस्थापन व पोलीस निरीक्षक वाहतुक यांच्याशी वाहतुक व प्रवाशी याबाबत समन्वय ठेवणे.

३) प्रवाशी वाहतुक सुरळीत होण्याच्या दृष्टीने अतिरिक्त बस उपलब्ध ठेवणे.

४) प्रवशी वाहतुक सुरळीत होण्याच्या दृष्टीने अतिरिक्त बस उपलब्ध ठेवणे.

५) आवश्यकतेनुसार वाहतुकीचे मार्ग बदलणे.

६) प्रवाशांना रद्द झालेल्या गाड्या, उशीरा सुटणाऱ्या गाड्या व तात्पुरत्या निवाऱ्याबाबत माहिती देणे.

७) बाधीत क्षेत्रामध्ये घडणाऱ्या घटना, तसेच नेमणुक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांविषयी जिल्हा नियंत्रण कक्षास माहिती देणे व अतिरिक्त मदतीबाबत कळविणे.[१२]

पोलीस निरीक्षकाचे कार्ये :

आपत्तीची सुचना मिळताच पोलीस निरीक्षक यांनी पूर्वतयारी म्हणून खालील गोष्टीची तयारी करणे आवश्यक आहे.

१. जखमी लोकांना प्राधान्याने रूग्णालयात हालवणे, तसेच रूग्णालयाच्या ठिकाणी जमावाला नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलीस बंदोबस्त ठेवणे.

२. बाधीत झालेल्या भागामध्ये बघेलोक, वाहने इत्यादीवर नियंत्रण ठेवणे.

३. बाधीत झालेल्या भागातील स्थावर मालमत्ता तसेच मौल्यवान गोष्टीवर देखरेख करणे.

४. बाधीत व्यक्ति व त्यांची वाहतूक करणारी वाहने यांची रहदारी सुरळीत करून देणे.

५. पोलीस विभागाच्या पद्धतीप्रमाणे पंचनामे करणे.

६. बस स्थानक, शाळा इत्यादी ठिकाणी जमाव नियंत्रण करणे, तसेच या ठिकाणी पोलिस बंदोबस्त ठेवणे.

७. बाधीत भागामध्ये नियमितपणे गस्त घालणे.

८. वाहतूकीची व्यवस्था करणे, तसेच बाधीत लोकांना पोलीस वाहन, तसेच खाजगी वाहनांच्या मदतीने सुरक्षीत ठिकाणी हालविणे.

९. कायदा व सुव्यवस्था राखणे.

१०. जनतेस माहिती होण्याच्या दृष्टीने यंत्रणा उभी करणे, त्यासाठी चिन्हांकीत तक्त्यांचा वापर करून, बाधीत क्षेत्राची माहिती देण्यात यावी.

११. शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच अफवा पसरू नयेत यासाठी आपत्ती व्यवस्थापन गटाची मदत घेण्यात यावी.

१२. प्रसार माध्यमांना आणि नागरीकांना माहिती देण्यासाठी माहिती केंद्राचे आयोजन करण्यात यावे.

१३. बाधीत क्षेत्रामध्ये घडणाऱ्या घटना, तसेच नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्या विषयी पोलीस नियंत्रण कक्षास माहिती देण्यात यावी व अतिरिक्त मदती बाबत कळविण्यात यावे.[१३]

वैद्यकीय अधिकाऱ्यांचे आरोग्य विषयक कार्ये :

१) रोगप्रतिकारक औषधांचा पुरवठा करणे व साथीच्या रोगांवर नियंत्रण ठेवणे.

२) साथीच्या रोगाविषयीची काळजी घेण्याबाबातची आवश्यक ती माहिती पुरवणे.

३) अन्न पाणी पुरवठा, स्वच्छता व टाकाऊ पदार्थांची विल्हेवाट लावण्यावर देखरेख ठेवणे.

४) ठरवून दिलेल्या नमुन्याप्रमाणे पडझडी बाबतचे मुल्यांकन करणे.

५) आपत्कालीन परिस्थितीमध्ये मदत करणाऱ्या स्वयंसेवी व खाजगी संस्था यांची यादी तयार करणे.

६) आपत्कालीन परिस्थितीमध्ये नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची व साधनसामुग्रीची माहिती जिल्हा नियंत्रण कक्षास कळविणे. तसेच आवश्यक असणाऱ्या इतर गोष्टींची मागणी करणे.[१४]

गट विकास अधिकाऱ्याचे कार्ये :

आपत्तीची सुचना मिळताच गट विकास अधिकारी यांनी पूर्व तयारी म्हणून खालील गोष्टीची तयारी करणे आवश्यक आहे.

१) आपत्तीच्या वेळी निर्माण करण्यात येणाऱ्या बाधीत व्यक्तिंच्या छावण्यांसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तुची व गरजांची पूर्तता करणे.

२) तात्पुरते निवारे उभारणे व वाहनांचे अधिग्रहण करण्याच्या कामामध्ये तहसिलदार यांना मदत करणे.

३) तात्पुरते निवारे व छावण्या उभारणे.

४) अन्न वाटपाची व्यवस्था करणे.

५) धान्य व धान्य शिजवण्यासाठी आवश्यक वस्तुच्या पुरवठ्यांची व्यवस्था करणे.

६) कपड्यांची व्यवस्था करणे.

७) स्वयंसेवी संस्था व खाजगी क्षेत्रातील व्यक्तिची निरनिराळ्या वस्तु व मनुष्य बळासाठी मदत घ्यावी.

८) बाधीत क्षेत्रामध्ये घडणाऱ्या घटना, तसेच नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्या विषयी जिल्हा नियंत्रण कक्षास माहिती देणे व अतिरिक्त मदती बाबत कळविणे.[१५]

नगरपालिका मुख्याधिकाऱ्याचे कार्ये :

जर पूरबाधीत नगरपालिका/नगरपरिषद अस्तित्त्वात असेल तर तेथील मुख्य अधिकाऱ्यास आपत्ती काळात सुचना मिळताच खालील कार्ये पार पाडणे आवश्यक आहे.

१) आपत्तीग्रस्त विभागामध्ये अग्नीशमन दलाची नेमणुक करणे.

२) आपत्तीग्रस्त भागातील लोकांना मदत व त्यांची सुटका करणे.

३) आपत्तीग्रस्त भागातील जखमी व्यक्तींना प्राधान्याने रूग्णालयामध्ये स्थलांतरीत करणेची व्यवस्था करणे.

४) आपत्तीमुळे निर्माण झालेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे.

५) मृत व्यक्ती व मृत जनावरांची विल्हेवाट लावणे.

६) पाण्याचे स्त्रोत अशुद्ध झाले असल्यास टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे.

७) पुरकालावधीमध्ये शुद्ध पिण्याचे पाणी पुरविणेच्या दृष्टीने उपाययोजना करणे.

८) नगरपालिका क्षेत्रामध्ये झाडे पडली असल्यास तात्काळ उपाय योजना करून रस्ता वाहतुकीसाठी खुला करणे.

९) बाधीत क्षेत्रामध्ये घडणाऱ्या घटना, तसेच नेमणुक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची जिल्हा नियंत्रण कक्षास माहिती देणे व अतिरिक्त मदती बाबत कळविणे.[१६]

अशासकीय संघटना व स्वंयसेवी संस्था :

अशासकीय संघटना व स्वयंसेवी संस्था या आपत्कालीन परिस्थितीमध्ये महत्त्वाची भुमिका बजावू शकतात. तसेच प्रशिक्षीत स्वंयसेवकांचा संच पुरवु शकतात.

आपत्कालीन परिस्थितीमध्ये करण्यात येणाऱ्या कार्यवाहीच्या वेळी, कार्यवाहीमध्ये एकवाक्यता व एकमेकांचे सहकार्य राहण्यासाठी ठरवून देण्यात आलेल्या सुचनांचे व्यवस्थित पालन करणे, माहितीची देवाण घेवाण करणे व तहसिलदारांना संपुर्ण आपत्तीची कल्पना येण्यासाठी, तसेच वापरणेत येत असलेल्या

साधन सामुग्रीची व आवश्यक असणाऱ्या साधन सामुग्रीची माहिती होण्यासाठी त्यांना या संघटनांनी वेळोवेळी अहवाल पाठविणे आवश्यक आहे.

आपत्तीची सुचना मिळताच अशासकीय संघटना व स्वंयसेवी संस्था यांनी खालील कार्ये पार पाडणे अपेक्षित आहे.

१) शोध व सुटका करण्याची कार्यवाही करणे.

२) माहिती मिळविणे.

३) प्रथमोपचार करणे.

४) मृतदेहाची विल्हेवाट लावणे.

५) झालेल्या नुकसानीचे मुल्यमापन करणे, माहिती सुविधा तात्पुरत्या निवाऱ्याच्या ठिकाणी पुरविणे.

६) जमा होणाऱ्या वस्तुंचे व पैशाचे वाटप व विनीयोग योग्यरित्या करणे.

७) बाधीत लोकांना सुरक्षीत स्थळी हलविणे, जमावावर नियंत्रण ठेवणे, अफवा पसरू नयेत यासाठी प्रयत्न करणे व वाहतुक व्यवस्था सुरळीत चालु ठेवणे.

८) मानसशास्त्रीय व मनोरूग्ण सेवा सहकार्य पुरविणे.

९) तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था पाहणे.

मदत व पुनर्वसन कार्याशी खालील संस्था संबंधीत आहेत. यापैकी बहुतांश संस्थांचा मदत व पुनर्वसन कार्यामध्ये प्रशासनास उपयोग होवू शकतो.

१) कृषी उत्पन्न बाजार समिती.

२) इंडीयन रेड क्रॉस सोसायटी.

३) एन.एस.एस.

४) रोटरी क्लब.

५) लायन्स क्लब.

६) मार्केट कमेटी

या व्यतिरिक्त स्थानिक स्तरावर आपत्तीच्या वेळी उदा. घर पडणे, आग, पुर येणे, अशा वेळी मोहल्ला कमेटी, दक्षता कमेटी यांची मदत होते. अशा कमेटींची माहिती अद्ययावत करून ठेवणे.

आपत्तीच्या तीव्रतेनुसार खालील संस्था आवश्यक असणाऱ्या वस्तु, उपलब्ध असणाऱ्या वस्तुबाबत नियंत्रण कक्षाच्या माध्यमातुन चांगल्या प्रकारे मदत करू शकतात.

१) अशासकीय संघटना तालुका स्तरावर, नागरीकांना आपत्तीला सामोरे जाणेसाठी त्या बाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी मदत करू शकतात.

२) आपत्तीच्या वेळी बाधीत होणाऱ्या क्षेत्रासाठी ग्रामपातळीवर आपत्तीव्यवस्थापन आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

नागरीकांचा सहभाग आवश्यक असणारी क्षेत्रे खालीलप्रमाणे आहेत. नागरीकांचा सहभाग करून घेणेसाठी आवश्यक बाबी.

१) आपत्तीचा सामना करण्यासाठी समाजातील प्रतिष्ठीत व्यक्तींना या प्रक्रियेमध्ये सामावुन घेवून त्यांची मते जाणुन घेवून त्यांच्या मध्ये आत्मविश्वास निर्माण करणे.

२) समाजाच्या सहभागाची कशा प्रकारे आवश्यकता आहे, ते प्रत्यक्ष संभाषण व चर्चेद्वारे जनतेस समजावून दिल्यास त्यातुन समाजास आपत्तीचा सामना करणेसाठी प्रेरणा मिळू शकेल.

३) या संपुर्ण प्रक्रियेमध्ये नागरीकांशी नियमित संवाद साधणे आवश्यक आहे.

४) स्थानिक पातळीवर जनतेस निर्णय प्रक्रियेमध्ये सामावून घेणे.

५) समाजाचा सहभाग आवश्यक असणारी क्षेत्रे निवडुन आपत्ती व्यवस्थापन आराखड्यामध्ये नोंद घ्यावी. त्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश असावा.

स्थलांतरण करताना खालील गोष्टीबद्दल लक्ष देणे आवश्यक आहे.

१) बाधीत व्यक्तींचे स्थलांतर करताना, सुरक्षीतता आणि कायदा व सुव्यवस्था राखणेसाठी समाजातील प्रतिष्ठीत व्यक्तींचे, सामाजिक संस्थाचे सहकार्य घ्यावे. संपुर्ण कुटुंबाचे एकत्रीत रित्या स्थलांतर करण्यात यावे.

२) कमी वेळेमध्ये गोंधळ निर्माण न होता व्यवस्थित स्थलांतरण त्वरीत होणेकरीता खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येणे आवश्यक आहे.

- आजारी व गंभीररित्या जखमी व्यक्तींचे स्थलांतरण.
- लहान मुले, स्त्रिया व अपंग व्यक्तोंचे स्थलांतरण.
- वयोवृद्ध व्यक्तींचे स्थलांतरण.
- इतर व्यक्तींचे स्थलांतरण.
- पाळीव प्राण्यांचे स्थलांतरण.

स्थलांतर केलेल्या कुटुंबाना खालीलप्रमाणे कार्यवाही करणे बाबत सुचना देण्यात याव्यात :

१) घरातील सर्व वस्तु सुरक्षीत ठेवा. खिडक्या दारे लावुन कुलूप लावा.

२) पाण्याचे नळ व विद्युत पुरवठा बंद करावा.

३) बिकट परिस्थितीत सापडेपुर्वी तात्काळ सुरक्षीत ठिकाणी जावे.

४) ठरवून दिलेल्या मार्गाप्रमाणे स्थलांतरण करावे, अन्य मार्गांचा वापर करणे धोकादायक ठरू शकते.

५) पुराच्या पाण्यात उतरू नये.

६) विद्युत वाहक तारा पासुन दुर रहावे.

आपत्तीच्या वेळी :

समाजातील प्रमुखांनी नागरीकांचे खालील प्रमाणे आचरण राहील याकडे लक्ष द्यावे.

१) जमाव शांत राहील हे पाहणे.

२) पळापळी व गडबड गोंधळ, गर्दी होणार नाही यावर नियंत्रण ठेवणे.

३) लोकांना सुरक्षीत स्थळी थांबण्यास व दुखापती पासून स्वत:चा बचाव करण्यास प्रोत्साहीत करणे.

४) पडझड झालेल्या इमारतीमध्ये लोकांना प्रवेश करू न देणे.

५) लोकांना विद्युत खांब अथवा विद्युत वाहकांना स्पर्श करू न देणे.

६) जीवितास धोका निर्माण झालेल्या परिस्थिती व्यतिरिक्त लोकांना दुरध्वनीचा वापर करू न देणे.

७) गंभीररित्या जखमी व्यक्तींचा त्यांच्या जीवास धोका निर्माण झाल्याशिवाय किंवा आणखी दुखापत होण्याची शक्यता असल्याशिवाय सुरक्षीत ठिकाणाहुन अन्यत्र हलविण्याचा प्रयत्न करू नये.

८) प्रथमोपचार हाती घेणे.

९) पाण्याची पाईपलाईन खराब झाल्यास पाण्याचा मुख्य पुरवठा बंद करणे.

१०) लोकांना बाधीत भागापासून दुर ठेवणे.

११) कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पुरामधुन बाहेर काढलेल्या साहित्यावर लक्ष ठेवण्यासाठी पोलीसांनी विनंती केल्यास त्यांना मदत करणे.

मदत व पुनर्वसनाच्या वेळी :

आपत्तीनंतर नागरीक खचलेले व काहीही करण्याच्या मनस्थितीत नसतात. परंतु ज्या वेळी आपले सर्वस्व हरविले नाही याची जाणीव झाल्यावर थोड्याच कालावधीत ते या परिस्थितीतुन सावरतात तेंव्हा मदत करणाऱ्या यंत्रणेने त्या ठिकाणी खालील प्रमाणे कार्य करावे.

१) बाधीत व्यक्तींना दैनंदिन व्यवहारामध्ये स्वत:हुन मदत करून त्यांना प्रोत्सहान द्यावे.

२) मृत व्यक्तींची ओळख पटविणे, त्यांची विल्हेवाट लावणे, व खराब झालेल्या अन्नाची विल्हेवाट लावणे.

३) साहित्य उचलणे, सुरक्षीत ठिकाणी लावणे, वाटप करणे, तात्पुरते निवारे उभारणे, अन्नाचे वाटक करणे अशा कामामध्ये सहभाग घेणे.

४) पडझडीमध्ये झालेल्या नुकसानीची अद्ययावत नोंद ठेवण्यास सहकार्य करणे.

५) कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मदत करणे.

६) घरातील स्वच्छता राखण्यास सहाय्य करणे.

७) मानसिक संतुलन राखण्यासाठी सांस्कृतीक कार्यक्रमासारख्या गोष्टींना प्रोत्साहन देणे.

मुल्यांकन

आत्तापर्यंत सांगली जिल्ह्याची संक्षिप्त माहिती घेऊन जिल्ह्यातील पूरआपत्ती व्यवस्थापकीय यंत्रणेचे कार्याच्या स्वरूपाबाबतची मांडणी केली आहे. आता वाळवा आणि शिरगांव या दोन्ही गांवातील पूरपरिस्थितीच्या वेळी शासकीय यंत्रणा आणि स्थानिक प्रशासन यांनी कशारितीने पूरआपत्तीला सामोरे गेले? त्यांना कोणकोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागले? आणि त्यावरील उपाययोजनांबद्दल प्रशासकीय आणि बिगर शासकीय यंत्रणेने केलेल्या शिफारशींचा विचार करूया.

तहसिलदार व उपविभागीय अधिकारी (ता. वाळवा) :

वाळवा आणि शिरगांवातील आपत्ती व्यवस्थापनाबद्दल माहिती देताना वाळवा तालुक्याचे तहसिलदार यांनी खालील प्रमाणे मत व्यक्त केले.

संभाव्य पूरबाधीत गांवामध्ये आपत्तीपूर्व नियोजन करताना पाठीमागील पूरस्थितीचा आढावा घेऊन नदीकाठच्या गांवाना दक्षतेचा इशारा दिला होता. धरणातील

पाणी पातळीवर लक्ष ठेवण्यात आले होते. पूरपरिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिकाऱ्यांना संभाव्य पूर धोक्याची सुचना देण्यात आली होती. प्राथमिक उपचाराची सोय उपलब्ध करून दिली होती व आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले होते. तसेच पूरग्रस्त भागातील रहिवाशांचे स्थलांतर करण्यासाठी कर्मचारी वर्गांना प्रशिक्षण देवून लष्करी यंत्रणेची मदत घेऊन कार्य पार पाडण्यात आले होते. पूराच्या वेळी दोरी, बॅटरी आणि यांत्रिक, लाकडी बोटींचा वापर करण्यात आला होता. त्याचप्रमाणे उपविभागीय अधिकाऱ्यांनी माहिती दिली की, मदत कार्यामध्ये सहभाग असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वाहनांची ओळख पटण्यासाठी ओळखपत्राची व्यवस्था करण्यात आली होती. त्याच गावातील लोकांनी देखील मदत केली होती.

पूराच्या संभाव्य कारणा बाबत माहिती देताना अधिकारी म्हणाले की, नदी-खोऱ्यातील जमिनीची धूप, वृक्षतोड व अतिवृष्टी या कारणामुळे पूरपरिस्थिती निर्माण होते. तसेच अलमट्टी धरणाच्या पाणी फुगवट्यामुळेही याभागात पूर येतो.

धरणे व पूर या बाबात बोलताना अधिकारी म्हणाले की, धरणामुळे पूरस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी काही प्रमाणात सहकार्य होते. परंतू जेव्हा मोठ-मोठी धरणे बांधली जातात तेव्हा त्या धरणातील बॅक वॉटर मुळे नदीमध्ये फुगवटा निर्माण होऊन पूरस्थिती उद्‌भवते.

पूरस्थितीमध्ये शासकीय अधिकारी वर्ग एकमेकांना परस्पर सहकार्य करतात आणि स्थानिक लोकसुद्धा पूरव्यवस्थापन योग्य पद्धतीने पार पाडण्यासाठी सहकार्य करताता कारण स्थानिक लोकांना तेथील पूरस्थितीची इंत्यभूत माहिती असते.

पूरग्रस्तांच्या वास्तव्याचे व्यवस्थापन करण्यासाठी छावण्या उभ्या करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये सर्व जीवनावश्यक वस्तूंची पूर्तता करण्यात आली होती. तसेच स्वस्त धान्य दुकानातून अन्नधान्याची उपलब्धता करण्यात आली होती. तसेच कपडे, आणि पशुधनासाठी चारा सुद्धा अन्न व नागरी पुरवठा मंत्रालयाकडून पुरवठा करण्यात आला होता.

आपत्तीग्रस्त भागात व्यवस्थापन करीत असताना काही समस्यांना तोंड द्यावे लागले. तसेच उपाययोजनातील काही त्रुटीसुद्धा आढळतात. उदा. आपत्तीग्रस्त भागात संपूर्ण व्यवस्थापन करीत असताना वेगवेगळ्या प्रशासकीय विभागामध्ये समन्वय निर्माण करणे हे कठीण काम आहे. यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांच्या समन्वय घडवून आणला पाहिजे. तसेच पूरपरिस्थिती उद्‌भविण्यापूर्वी योग्य ती दक्षता घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शासकीय कार्यामध्ये सहभागाबद्दल नागरिक अजून पूरेसे जागरूक झालेले नाहीत. हे होणे गरजेचे आहे. तसेच उपविभागीय अधिकाऱ्यांनी पूरपरिस्थितीची मर्यादा ओळखता न आल्याने लोकांच्या स्थलांतराचा प्रश्न निर्माण झाला होता, यांत्रिक बोटींची संख्या कमी पडली आणि आपत्तीग्रस्त लोकांना तातडीने आर्थिक मदत पुरविण्यात आली नाही. पूर आपत्तकालीन यंत्रणा योग्य पद्धतीने राबविण्यासाठी सर्व प्रशासकीय विभागामध्ये समन्वय निर्माण करण्यात यावा. पूरआपत्तकालीन परिस्थितीची दक्षता घेऊन सतर्कता ठेवण्यात यावी अशी शिफारस तहसिलदारांनी केली आहे. राज्य प्रशासन, स्थानिक नागरिक, स्वयंसेवी संघटना आणि सहकारी संस्था यांच्या एकत्रित प्रयत्नांचा योग्य तो परिणाम होऊन पूर आपत्तीच्या काळातील मृत्यूच्या संख्येत व मालमत्तेच्या नुकसानीत घट होऊ शकते. तसेच पूर ही नैसर्गिक आपत्ती आहे त्यामुळे सामान्य जनतेचे जीवन विस्कळीत होते. परंतू योग्य काळजी घेतली तर आपणास या आपत्तीवर मात करता येईल. पूर कालावधीत जनतेचा सहभाग व सहकार्य लाभल्यामुळे जीवित व वित्त हानी कमी होऊ शकते. आणि त्यासाठी पूर व्यवस्थापनात संगणक प्रणाली राबविणे गरजेचे आहे. तसेच उपविभागीय अधिकाऱ्यांनी असे सांगितले की, दीर्घकालीन उपाययोजना करणे गरजेचे आहे. आपत्तकालीन परिस्थिती विषयी लोकांना जास्त माहिती देण्यात यावी.

पाटबंधारे विभाग - सांगली :

पूरग्रस्त गावातील म्हणजे वाळवा आणि शिरगांवातील आपत्ती व्यवस्थापनाबद्दल कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभागाने अशी माहिती दिली की, पूर बाधीत गांवामध्ये पूराचे पाणी किती पातळी पर्यंत येईल याबाबतच्या खूणा करण्यात आल्या होत्या. तसेच पुराच्या वेळी कर्मचाऱ्यांकडून गावोगांवी माहिती दिली जात होती. याशिवाय प्रत्येक गांवात पाणी पातळीचा अंदाज घेऊन पूरग्रस्त भागातील लोकांना स्थलांतर करण्याबाबत महसूल विभागास सांगितले जात होते. त्यासाठी संबंधीत कर्मचारी वर्गांना प्रशिक्षण देण्यात आले होते. म्हणजेच संभाव्य पूर बाधीत गांवामध्ये आपत्तीपूर्व नियोजन याबद्दल दक्षता घेऊन संबंधीत कर्मचाऱ्यांना दक्ष राहण्यास सांगितले होते हे स्पष्ट होते.

पूराच्या संभाव्य कारणाबाबत माहिती देताना असे स्पष्ट केले की, गेल्या २००५ आणि २००६ मध्ये पावसाचे प्रमाण वाढले असून आणि धरणातून सोडण्यात येणारे पाणी व मुक्त पाणलोट क्षेत्रातील येणारे पाणी यांचा एकत्रित विसर्ग जास्त होतो. तथापि धरण सुरक्षेसाठी धरणातून पाणी सोडावे लागले. याशिवाय धरणातील पाणीसाठा कमी न करण्याचे एक कारण म्हणजे वीज निर्मिती हे देखील आहे. कोयना धरण वीजनिर्मितीसाठी बांधलेले धरण आहे. पण अपेक्षित वीज आणि प्रत्यक्ष वीज निर्मिती मधील तफावत दिसून येते. प्रचंड पाणी वीज निर्मितीशिवाय वाहून जावून पूरपरिस्थिती ओढावते.

धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पर्यावरणाचा ऱ्हास रोखणे, पाणलोट क्षेत्रातील हिरवे अच्छादन कायम राहिल याची काळजी घेणे शक्य त्या ठिकाणी छोटे बांधतळी, शेततळी तयार करणे या सर्वातून जमिनीची पाणी धारण करण्याची क्षमता वाढेल. भूजलाच्या साठ्यात वाढ होऊन पूर संकट रोखता येऊ शकेल. म्हणजेच धरणे व पूर यामध्ये परस्पर संबंध आहे हे सिद्ध होते.

कार्यकारी अभियंता मार्फत पूराच्या संभाव्य कारणाचे अहवाल महाराष्ट्र शासनाला पदसोपान पद्धतीने सादर केले आहे. पूरा संदर्भात आपले मत मांडताना त्यांनी अतिवृष्टी काळात मुक्त पाणलोट व धरणातील विसर्गामुळे पूर प्रमाण वाढते. आणि जर अलमट्टी धरणातून विसर्गाचे योग्य प्रकारेच व्यवस्थापन केल्यास आपण पूराची तिव्रता कमी करू शकतो. धरणातून जास्त पाणी सोडणे आवश्यक असल्यास दूरदर्शन आणि आकाशवाणीवरून सूचना देऊन दक्षतेचा इशारा देण्यात येतो. पूर प्रवण भागातील लोकांना स्थलांतर करण्याबाबत सोय केली जाते.

कार्यकारी अभियंत्याच्या मते संपूर्ण जलव्यवस्थापन करीत असताना पाटबंधारे विभागास विविध धरणातून सोडण्यात येणारा विसर्ग व मुक्त पाणलोट क्षेत्रातील विसर्ग यांचा प्रत्येक वेळी विचार करून त्यानुसार व्यवस्थापन करण्यात यावे.

एस.टी. व्यवस्थापक सांगली :

आपत्तीपूर्व नियोजनाबद्दल एस.टी. व्यवस्थापक सांगली यांनी खालील माहिती दिली. सर्व आगार प्रमुखांना पर्यायी वाहतूकोचा मार्ग निश्चित करून, वाहन चालकांना सुचना देण्यात आल्या होत्या. ग्रामपंचायती, पोलीस यांच्या नियंत्रणाद्वारे योग्य व्यवस्थापन करण्यात आले होते. तरीसुद्धा त्राळवा आणि शिरगांव यो दोन्ही गांवामध्ये पर्यायी वाहतूक व्यवस्था देखील नैसर्गिक आपत्तीमध्ये ८ दिवस कोलमडलेली होती. सर्व रस्ते बंद असल्याने फक्त मिरज-तासगांव हा एकच रस्ता चालू होता. परंतू धोक्याच्या सुचनासाठी पथदर्शकाची उभारणी वास्तवात केलेली नव्हती. पूरापासून योग्य प्रकारे व्यवस्थापन करण्यासाठी रस्त्यांची उंची वाढविणे, रस्ते डांबरीकरणे करणे, प्रत्येक एस.टी. चालकास रस्त्याचे नकाशे देण्यात आले पाहिजेत. त्याचप्रमाणे पर्यायी वाहतूक व्यवस्थेच्या सर्व सुचना देण्यासाटी योग्य प्रकारे नियोजन करण्यात आल्या पाहिजेत. अशा प्रकारचे नियोजन दिर्घकालीन असावे. सर्व स्थानिक स्वयंसेवी संघटनांची मदत सक्षम होण्यासाठी प्रशासकीय मदत मिळणे गरजेचे आहे अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

सहाय्यक पोलीस निरीक्षक (वाहतूक - सांगली) :

सहाय्यक पोलीस निरीक्षक वाहतूक, सांगली यांनी खालील प्रमाणे माहिती दिली. पूरपरिस्थिती मध्ये बॅरकटिंग करून रोड बंद करण्यात आले होते. सांगली जिल्ह्यातील वाहतूक व्यवस्था तासगाव-मिरज-कुपवाड या मार्गाने वळवण्यात आली होती. वायरलेस संचाद्वारे वेळोवेळी नियंत्रण कक्षास माहिती दिली जात होती.

वाळवा आणि शिरगांव या दोन्ही गांवामधील वाहतूक व्यवस्था बंद ठेवण्यात आली होती. पर्यायी व्यवस्था म्हणून यांत्रिक बोटी, लाकडी बोटी इ. चा वापर करून लोकांना सुरक्षित स्थळी पोहचविण्याचे काम केले जात होते.

सर्व वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांकडे आधुनिक साहित्य देण्यात आले पाहिजे तसेच पूराची संभाव्य कारणे शोधून त्यावर योग्य नियोजनात्मक भूमिका घेवून प्रश्न सोडविले पाहिजेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आरोग्य विभाग जिल्हा सांगली :

आपत्तीपूर्व नियोजनाची माहिती आरोग्य अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे दिली.

अ) नियंत्रण कक्षाची स्थापना : प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्यालयात पूराच्या कालावधीत नियंत्रण कक्ष स्थापन करून २४ तास कार्यरत राहील याची दक्षता घेतली होती व कक्षाचा दुरध्वनी क्रमांक सर्वांनी कळविण्यात आला होता.

ब) मदत पथकाची स्थापना : प्राथमिक आरोग्य केंद्र पथकामध्ये एक अधिकारी, एक सहाय्यक, एक आरोग्य सेवक (पुरूष), एक शिपाई, एक वाहन व वाहन चालक यांचा समावेश केला होता.

क) औषधसाठा : प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर पुरेसा औषधसाठा उपलब्ध करण्यात येतो. इमर्जन्सी किट वैद्यकीय अधिकारी यांच्या कक्षात तयार ठेवले जाते. प्रत्येक उपकेंद्र स्तरावर पुरेसा औषधांचा साठा आणि रक्तेपेढी ठेवण्यात आली होती. डिस्पोजेबल सिरींजेस उपलब्ध करून वाळवा आणि शिरगांव येथील सर्व लोकांना लसीकरण करण्यात आले होते.

कार्यक्षेत्रातील पूरपरिस्थितीचा संभाव्य धोका लक्षात घेऊन अशा ठिकाणी त्वरीत नियंत्रण कक्ष स्थापन करून पाणी पुरवठा शुद्धीकरण, औषध पुरवठा, रूग्णांना उपचार तसेच किटकांचा प्रार्दुभाव होणार नाही याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात आली होती.

पुरामुळे नदीकाठच्या गांवात पाणी शिरून त्या गावाशी होणारा संपर्क तुटतो त्यामुळे तेथील रहिवाशांना आरोग्य विषयक सेवा उपलब्ध होऊ शकत नाही. परिणामी साथीचे नियंत्रण, पाणी शुद्धीकरण, दुर्घटना या बाबतीत मदतकार्य वेळेत मिळू न शकल्याने आरोग्य सुविधा पोहचविण्यास विलंब होतो. यासाठी शासकीय पातळीवर नियोजन करण्यात यावे. रूग्णवाहिका, शवपथके यांची संख्या कमी पडते ती वाढविले पाहिजे.

गट विकास अधिकारी (ता. वाळवा) :

वाळवा आणि शिरगांव या दोन गांवातील आपत्ती व्यवस्थापनाबद्दल माहिती देताना गटविकास अधिकाऱ्यांनी असे सांगितले की, संभाव्य पूर बाधीत गांवामध्ये आपत्तीपूर्व नियोजन करताना गांवातील सर्व लोकांना पूर्वसुचना दिल्या होत्या. तसेच प्रशासकीय कर्मचाऱ्यांना पूरग्रस्त लोकांना सुरक्षित ठिकाणी कसे पाठवायचे व बोटींग बद्दल माहिती देण्यात आली होती. स्थलांतर करण्यासाठी यांत्रिक बोटी, लाकडी बोटी आणि टेम्पो, बस यांचा वापर करण्यात आला होता.

पूराची संभाव्य कारणे म्हणजेच अतिवृष्टी आणि वाढती लोकसंख्या यामुळे राहण्यासाठी लोकांनी घरे नदीकाठी बांधण्यास सुरूवात केली आहे. तसेच धरणाचे पाणी जास्त सोडल्यास नदीपात्रातील पाण्याची पातळी वाढून पूरस्थिती निर्माण होते. वरील कारणांचा अहवाल शासनास पदसोपान पद्धतीने पाठविण्यात आला आहे. तसेच नद्यांचा प्रवाह वळविता येतो आणि विशिष्ट प्रकारचे बांधकाम करून पूर नियंत्रण करता येते. परंतू त्यासाठी खूप मर्यादा आहेत. एकतर पुराचे पाणी एका बाजूने

अडवले गेले तरी इतरत्र विशेषत: मागील बाजूस पाणी पसरते आणि त्या ठिकाणी पुराचा धोका उद्‌भवतो. त्याच प्रमाणे पाण्याबरोबरच येणारी माती गाळाच्या रूपाने साठून राहिल्यामुळे जलस्तराची उंची वाढते व काही काळानंतर ही बांधकामे गाळाने भरून पुराचा धोका संभवतो.

नैसर्गिक पुरात पाण्याचा लोंढा येतो आणि ओसरतो. पण या कृत्रिम पुरामध्ये होत नाही. पाणी दिर्घकाळ निचरा न होता साठून राहते व त्यामुळे नुकसानही वाढते. साचलेले पाणी अशुद्ध व दूषित होण्याचा आणि त्याचे दुष्परिणाम किनाऱ्यावरील लोकांवर होण्याचा सतत धोका असतो. अलमट्टी धरणातील पाण्याचा फुगवटा आणि वाढते शहरीकरण यामुळे अलिकडच्या काळात पूराचे परिणाम जाणवत आहेत.

पुराच्या संकटाला वारंवार सामोरे जावे लागत असताना आता पूरनियंत्रणाच्या नव्हे तर पूर व्यवस्थापनाच्या दिशेने प्रयत्न झाले पाहिजेत अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली आहे.

पंचायत समिती सभापती (ता. वाळवा) :

पूरग्रस्त गांवामध्ये आपत्ती व्यवस्थापना बद्दल पंचायत समितीचे सभापती असे म्हणाले की, पाण्याच्या पातळी संदर्भात दिशादर्शक सूचना देण्यात आल्या होत्या. पूराच्या धोक्याचा विचार करून कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले होते. म्हणजेच आपत्तीपूर्व नियोजनाबद्दल दक्षता घेण्यात आली होती हे स्पष्ट होते.

पूराच्या संभाव्य कारणाबाबत मत व्यक्त करताना ते म्हणाले की, विकासाच्या अनुषंगाने झालेल्या कोणत्याही प्रकल्पाच्या बाबत पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास झाला नाही त्यामुळे पुराचे धोके संभावत आहेत. तसेच अलमट्टी धरणातील पाण्याचा फुगवटा, वृक्षतोड, नदीपात्रात करण्यात आलेले अतिक्रमण इ. कारणांचा अहवाल शासनास पाठविण्यात आला आहे.

पूरग्रस्त लोकांना स्थलांतरीत करीत असताना अनेक अडचणी निर्माण होतात. यामध्ये यांत्रिक साहित्यांची कमतरता, अपुरा कर्मचारी वर्ग, तसेच शासनाचे पूराबाबत नियोजनात्मक धोरण नाही त्यामुळे फार मोठे नुकसान होताना दिसत आहे.

पूरआपत्ती व्यवस्थापना बद्दल उपाय योजना सुचविताना ते म्हणाले, धरणे, महारस्ते, बंधारे, खाणकाम उद्योग, व शहर विकास आराखडे यासारख्या कार्यांचा पर्यावरणीय परिणामांचा एकात्मकरीतीने अभ्यास करून आणि शहर नियोजन 'रेडझोन' निश्चित केले तर गंभीर परिणाम व नुकसान टाळता येईल. तसेच शास्त्रीय दृष्टीने पूराचा अभ्यास करून नियोजन करण्यात आले पाहिजे.

सरपंच, वाळवा :

पूरासंदर्भात माहिती देताना वाळवा गांवचे सरपंच असे म्हणाले की, पूराचे पाणी वस्त्यामध्ये शिरल्याने घरे अंशत: व पूर्णत: उध्वस्त होतात. पूराचा धोका शाळा आणि अंगणवाडी यांना सुद्धा संभवतो. हिवताप, कॉलरा सारख्या रोगराई गांवामध्ये पसरतात. अशा आपत्तीकालीन परिस्थितीमध्ये ग्रामपंचायत पुढील मदत कार्य करते.

पूरग्रस्तांचे स्थलांतर करणे, राहण्याची, जेवणाची आणि आरोग्या विषयक मदत पुरवणे, तसेच पशुधनांचेही स्थलांतर करण्यात येते. पशुधनासाठी चारा छावणी उभारण्यात येते. पूरग्रस्त भागामध्ये ग्रामसेवक, बी.डी.ओ., तहसिलदार, यांच्या मार्फत पंचनामे करण्यात येतात. पंचनामे करताना गरजू व गरीब आपत्तीग्रस्तांना शासकीय मदत कमी प्रमाणात मिळते. रेशन वाटप देखील होते. परंतू तातडीने शासकीय मदत मिळत नाही. काही पूरग्रस्तांचे रेशन कार्ड पाण्यामध्ये वाहून जातात त्यांना मदत देण्यात येत नाही. पूरग्रस्त भागात शासनामार्फत आरोग्य सेवा कमी प्रमाणात पुरविली जाते. पूरग्रस्ताना शास्कीय मदत वाटप करताना बेजबाबदारी व भ्रष्टाचार काही प्रमाणात होतो. आपत्तीग्रस्तांची यादी तयार न करता मदत वाटप होते त्यामुळे आर्थिक गैरव्यवहार काही प्रमाणात होतात.

पूरग्रस्त भागामध्ये स्थानिक प्रशासनाचे, स्वयंसेवी संघटनांचे व सहकारी संस्थांची नियंत्रण आणि मदत मिळत असते. तसेच पोलीस यंत्रणा राबविण्याचा जास्त गरज नाही कारण सर्वत्र पाणीच-पाणी असते. त्यावेळी पूरग्रस्त भागात लोक प्रतिनिधी भेट देतात.

पूर ओसरल्यानंतर रोगराई पसरू नये म्हणून गांवामध्ये स्वच्छता मोहिम राबविली आणि औषध फवारणी केली होती. कचरा गांवाबाहेर टाकून त्यावर जंतूनाशक औषधे फवारणी करण्यात आली होती.

आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि लोकप्रतिनीधी यांच्या कार्यावर समाधानी नाही कारण यंत्रणा अपूरी पडते आणि लोक प्रतिनधी स्वत: मदतीच्या कार्यामध्ये भाग घेत नाहीत. वरील दोन्ही गोष्टी घडल्यास पूराचे नुकसान कमी होण्यास मदत होईल.

सरपंच, शिरगांव :

शिरगांव या पूरग्रस्त गांवचे सरपंच माहिती देताना म्हणाले की, पूरामुळे जुन्या घरांच्या भिंती पडतात, भिंतीना भेगा पडतात. तसेच शाळा व अंगणवाडी यांना सुद्धा पुराचा धोका संभवतो. गांवामध्ये लेप्टोपायरसिस, हिवताप, कावीळ इ. रोग पसरतात. अशा परिस्थिती मध्ये ग्रामपंचायत खालील मदत करते.

पूरग्रस्तांचे स्थलांतर करणे, अन्न, वस्त्र, निवारा आणि शुद्ध पाणी पुरवठा, सहकारी संस्था आणि ग्रामपंचायत यांच्या मार्फत पुरविले जाते. तसेच पशुधनाचे स्थलांतर करून चाऱ्याची व्यवस्था करण्यात येते.

पंचनामा बाबत बोलताना सरपंच म्हणाले की, पंचनामा तलाठी, ग्रामसेवक, तहसिलदार आणि प्रशासकीय अधिकारी मार्फत होतो. परंतू पंचनामा करताना काही दोष आढळतात. संयुक्त कुटुंबात मदत एकाच व्यक्तिस दिली जाते, यादी तयार केली जात नाही. काही प्रमाणात भ्रष्टाचार होताना आढळतो.

शासनाची मदत अपूरी पडते यासाठी आपत्तीपूर्व नियोजन करून धान्य, रॉकेल, आणि मुलभूत गरजांचा पुरेसा साठा पूरग्रस्त भागामध्ये ठेवण्यात यावा. गावातील स्वयंसेवी संघटनांना शासनाने काही प्रमाणात मदत दिली पाहिजे. यांत्रिक बोटींच्या

संख्येत वाढ करण्यात यावी. पशुधनाचे स्थलांतर आणि व्यवस्थापनासाठी वेगळी मोहिम राबविण्यात आली पाहिजे.

पूर नुकसानाच्या बाबतीत निश्चित अंदाज करण्याचा शास्त्रीय दृष्टीने प्रयत्न झालाच नाही. पूरामध्ये नुकसानीत झालेल्या लोकांची भरपाई कशी देणार? व पूनर्वसन कसे करणार? उदा. पूरामध्ये झालेल्या पिकांचे नुकसान, वाहून गेलेली सुपीक माती, याबाबत शास्त्रीय दृष्टीने चिकित्सा करून नुकसान भरपाई देण्यात आली पाहिजे. पूनर्वसनाचा कार्यक्रम जास्त प्रमाणात राबविण्याची गरज आहे. व शेतकऱ्यांना सर्व प्रकारची मदतही देण्यात यावी, वरील कार्य करताना भ्रष्टाचार होणार नाही याची दक्षता घेण्यात आली पाहिजे.

ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वाळवा :

पूरासंदर्भात माहिती देताना वाळवा गावचे ग्रामसेवकांनी पुढील माहिती दिली. सर्व वस्त्यामध्ये पूराचे पाणी आल्याने घरांच्या भिंती कोसळल्या. काहींची घरे पूर्णपणे उध्वस्त झाली. गावामध्ये हिवताप, कॉलरा, काविळ यासारखे रोग दूषित पाण्यामुळे पसरण्याची शक्यता निर्माण झाली होती. पूरपरिस्थिती उद्‌भवल्यानंतर गावातील लोकांना सुरक्षित स्थळी पोहचविण्याचे कार्य ग्रामपंचायत कर्मचारी, स्वयंसेवी संघटना आणि आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, पोलीस यंत्रणा करतात. वरील सर्व अधिकारी पंचनामे करताना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग दर्शवितात. पशुधनांचे देखील योग्य ठिकाणी स्थलांतर करण्यात येते. पूराच्या संकटापासून गाव सुरक्षित राहण्यासाठी दिर्घकालीन नियोजनबद्ध आराखडा तयार करून ते राबविणे फार महत्त्वाचे आहे.

ग्रामसेवक, ग्रामपंचायत, शिरगांव :

पूरासंदर्भात माहिती देताना शिरगांव गावचे ग्रामसेवकांनी पुढील माहिती दिली. पाठीमागील पूरपरिस्थितीचा आढावा घेऊन, नदीकाठच्या भागातील लोकांना दक्षतेचा इशारा देण्यात आला होता. स्थलांतर करण्यासाठी प्रामुख्याने यांत्रिक बोटी, लाकडी बोटींचा वापर करण्यात आला होता. त्याच बरोबर लष्करी जवान, स्वयंसेवी संघटना यांची मदत मिळाली होती.

पूर व्यवस्थापनामध्ये स्थानिक लोकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. कारण या लोकांना तेथील परिस्थितीची इंत्यभूत माहिती असते. पूर आपत्तीकालीन परिस्थिती उद्‌भवण्यापूर्वी दक्षता घेण्यात यावी आणि व्यवस्थापन यंत्रणा सतर्क ठेवावी.

ग्रामपंचायत सदस्य, वाळवा :

पूरासंदर्भात माहिती देताना वाळवा गावच्या ग्रामपंचायत सदस्यांनी ४ (दोन पुरूष, २ स्त्रिया) पुढील माहिती दिली. नैसर्गिक आपत्तीचा धोका वाळवा गांवाला फार मोठ्या प्रमाणात बसत आहे. घरे उध्वस्त झाली आहेत. अंगणवाडी, शाळा यांना पूराचा धोका संभवतो. तसेच गांवातील लोकांना हिवताप, कॉलरा, काविळ इ. आजारांना सामोरे जावे लागते. त्याचप्रमाणे पशुधनाच्या स्थलांतराचे आणि चाऱ्याचा प्रश्न निर्माण होतो.

कमी प्रमाणात शासकीय मदत मिळते. स्वयंसेवी संघटना फार महत्त्वाचे कार्य पार पाडतात. यांना पाठबळ देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. पूराचे नियंत्रण करण्यासाठी धरणातील पाणी सोडण्याची पद्धत बदलावे. गावातील सर्व अनुभवी लोकांच्या एकत्रित बैठका घेऊन परिणामकारक नियोजन करावे आणि आपले गांव पूरापासून वाचविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले पाहिजेत.

ग्रामपंचायत सदस्य, शिरगांव :

पूरासंदर्भात माहिती देताना शिरगांवच्या ग्रामपंचायत सदस्यांनी ४ (२पुरूष, २ स्त्रिया) पुढील माहिती दिली. शिरगांवातील सर्व वस्त्यामध्ये पूराचे पाणी शिरते त्यामुळे बेटाचे स्वरूप प्राप्त होते. घरे, शाळा, अंगणवाडी यांना पुराचा धोका संभवतो. पूरामुळे हिवताप, कॉलरा, काविळ इ. रोगराई परसरते. लोकांचे, पशुधनांचे स्थलांतर करण्यात येते. पूरपरिस्थितीची पाहणी लोकनेते, प्रशासकीय अधिकारी करतात आणि पंचनामादेखील केला जातो. परंतू शासकीय मदत गरजू लोकांना कमी प्रमाणात मिळते.

गावकऱ्यांना कायमस्वरूपी पुर्नवसन करावे असे वाटत नाही कारण गावकऱ्यांनी स्वत:च्या मोठ्या इमारती बांधल्या आहेत आणि पिकाऊ जमिनी सोडून जाणे योग्य नाही. शासकीय मदत जास्त प्रमाणात मिळावी. प्रत्यक्ष प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मदतीचे वाटप करावे.

स्वयंसेवी संघटना (वाळवा आणि शिरगांव) :

शासनाच्या मदतीवर आम्ही समाधानी नाही. कारण ज्या गरीब लोकांना मदतीची गरज असते त्यांना अतिशय कमी प्रमाणात मदत दिली जाते. स्वयंसेवी संघटनांना शासनाचे अनुदान, अत्याधुनिक यांत्रिक बोटी, पुरविल्या जात नाहीत. शेतकरी, शेतमजुर, पशुधन, या सर्वांचे नुकसान नैसर्गिक आपत्तीने घडून आले आहे. त्यामुळे शासनाने या नुकसानीचे योग्य प्रकारे पंचनामे करून शासकीय अधिकाऱ्यां मार्फत मदत वाटप करण्यात यावी. त्याचप्रमाणे 'रेडझोन' भागातील लोकवस्तीचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यात यावे.

पूरपरिस्थिती निर्माण होते तेव्हा शिरगांवातील लोकाना बाहेर पडण्यासाठी बंधारा व होडी शिवाय दुसरा मार्ग नाही. पूर आल्यानंतर नागठाणे बंधारा पूर्णपणे पाण्याखाली जातो. त्यामुळे गांवातील सर्व लोकांची मागणी आहे की, वाळवा ते शिरगांव पुल बांधुन मिळावा. तसेच शिरगावला जोडणाऱ्या सर्व रस्त्यांची उंची वाढविण्यात यावी. तसेच पूरस्थितीच्या वेळी संडासचे प्रश्न फार गंभीर रूप धारण करते. त्यासाठी उंच ठिकाणी सार्वजनिक संडास बांधण्यात यावेत. रेशन वाटप व्यवस्थीत रीतीने होत नाही. पूरग्रस्त लोकांना धान्यासाठी वाट पाहावी लागते. अनेक श्रीमंत लोकांची दारिद्र्य रेषेखाली नांवे आहेत व गरीब लोकांना त्यापासून वंचित ठेवले जाते. तसेच धान्य हे अत्यंत खराब दिले जाते. शासन टाकाऊ मालच जणू जनतेला मदत म्हणून देते. परंतू आपत्तीच्या वेळी गांवातील गरीब लोक शाळेतील मुले तेच धान्य खातात व लोक त्यामुळे अनेक आजारांना बळी पडतात. शिरगांवात सरकारी दवाखाना नसल्याने लोकांना शहरामध्ये जावे लागते.

वरील सर्व प्रश्न सोडविल्यास आपत्तीच्या वेळी पूरग्रस्त लोक योग्य प्रकारे संकटाला सामोरे जातील आणि आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रम राबविण्यास मदत होईल. आता लोकप्रतिनिधी, अधिकारी वर्ग आणि स्वयंसेवी संघटना यांना पूरपरिस्थितीत या दोन्ही गांवामध्ये कार्य करत असताना कोणकोणत्या समस्या उदयास येतात. त्या समस्या सोडविण्यासाठी सुचविलेल्या सुचनाबद्दल संक्षिप्तरितीने मांडणी करूया.

तक्ता क्र. ३.४
पूरपरिस्थितीतील समस्या आणि सुचना (बिगर शासकीय वर्ग)

अ.क्र.	बिगर शासकीय वर्ग	अ.क्र.	समस्या	अ.क्र.	सुचना
१.	सरपंच वाळवा आणि शिरगांव	१.	गरजू व गरीब आपत्तीग्रस्तांना शासकीय मदत कमी प्रमाणात मिळते.	१.	लोकप्रतिनिधी यांच्या कार्याबद्दल दक्षता घेण्यात यावी. आपत्तीकालीन व्यवस्थापन यंत्रणा सक्षम होणे गरजेचे आहे. आणि लोकप्रतिनिधींनी सुद्धा मदतीच्या कार्यात भाग घेतला पाहिजे.
		२.	तातडीने शासकीय मदत मिळत नाही.	२.	यांत्रिक बोटीच्या संख्येत वाढ करण्यात यावी.
		३.	पूरग्रस्तांचे रेशनकार्ड पाण्यामध्ये वाहून जाते. त्यांना मदत मिळत नाही.	३.	आपत्तीपूर्व नियोजन करून धान्य, रॉकेल आणि मुलभूत गरजांचा पुरेसा साठा पूरग्रस्त भागामध्ये ठेवण्यात यावा.
		४.	आरोग्य सेवा कमी प्रमाणात पुरवली जाते.	४.	पुर्नवसनाचा कार्यक्रम जास्त प्रमाणात राबविणे गरजेचे आहे.
		५.	शासकीय मदत वाटप करताना बेजबाबदारी व भ्रष्टाचार काही प्रमाणात होतो.	५.	पुरामध्ये झालेल्या पिकांचे नुकसान, वाहून गेलेली सुपिक माती याबाबत शास्त्रीय दृष्टीने चिकित्सा करून नुकसान भरपाई देण्यात आली पाहिजे.
		६.	लोकप्रतिनिधींचे कार्य समाधानकारक नाही.	६.	मदत आणि नुकसान भरपाई कार्य करताना भ्रष्टाचार होणार नाही याची दक्षता घेण्यात आली पाहिजे.
		७.	व्यवस्थापन यंत्रणा अपुरी पडते.	७.	गांवातील स्वयंसेवी संघटनांना शासनाने काही प्रमाणात मदत दिली पाहिजे.
		८.	लोकप्रतिनीधी स्वत: मदतीच्या कार्यात सहभागी होत नाहीत.	८.	पूरपरिस्थितीची इतंभूत महितीसाठी स्थानिक लोकांचा सहभाग महत्त्वाचा आहे.
		९.	पंचनामा करताना काही दोष आढळतात.		
		१०.	पूर नुकसानीच्या बाबतीत निश्चित अंदाज करण्याचा शास्त्रीय दृष्टीने प्रयत्न झालाच नाही.		
२.	ग्रामसेवक वाळवा आणि शिरगांव		--	१.	दिर्घकालीन नियोजनबद्ध आराखडा तयार करून तो राबविणे फार महत्त्वाचे आहे.
			--	२.	पूरस्थिती उद्भवण्यापूर्वी व्यवस्थापन यंत्रणा सतर्क ठेवावी.

अ.क्र.	बिगर शासकीय वर्ग	अ.क्र.	समस्या	अ.क्र.	सुचना
१.	ग्रामपंचायत सदस्य वाळवा आणि शिरगांव	१.	पूरव्यवस्थापनाचे परिणामकारक नियोजन नाही.	१.	गावातील सर्व अनुभवी लोकांच्या एकत्रित बैठका घेऊन परिणामकारक नियोजन करावे.
				२.	पूराचे नियंत्रण करण्यासाठी धरणातील पाणी सोडण्याची पद्धत बदलावी.
				३.	प्रत्यक्षात प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मदतीचे वाटप करावे.
				४.	स्वयंसेवी संघटनांना शासनाने पाठबळ द्यावे.
२.	स्वयंसेवी संघटना वाळवा आणि शिरगांव	१.	स्थलांतरासाठी अत्याधुनिक यांत्रिक बोटी पुरवल्या जात नाहीत.	१.	नुकसानीचा योग्य प्रकारे पंचनामा करून शासकीय अधिकाऱ्यांच्या मार्फत मदत वाटप करण्यात यावी.
		२.	नुकसानीचा योग्यप्रकारे पंचनामा केला जात नाही.	२.	शिरगांवला जोडणाऱ्या सर्व रस्त्यांची उंची वाढविण्यात यावी.
		३.	गरजूना अतिशय कमी प्रमाणात मदत दिली जाते.	३.	वाळवा ते शिरगांव पूर बांधून मिळावा.
		४.	पूरग्रस्तांना धान्याची वाट पहावी लागते.	४.	उंच ठिकाणी सार्वजनिक संडास बांधण्यात यावे.
		५.	रेशन वाटप व्यवस्थितरितीने होत नाही.	५.	रेडझोन भागातील लोकवस्तीचे कायमस्वरूपी पुर्नवसन करण्यात यावे.
		६.	धान्य अत्यंत निकृष्ट दर्जाचे दिले जाते.		
		७.	श्रीमंत लोकांची नांवे दारिद्यरेषेखाली आहेत व गरीब लोकांना त्यापासून वंचित ठेवले आहे.	६.	दारिद्र्यरेषेची फेरतपासणी करून योग्य निकषानुसार नवीन यादी तयार करावी.
		८.	रेडझोन भागातील लोकवस्तीचे कायमस्वरूपी पुर्नवसन केले नाही.	७.	शिरगांव गावामध्ये प्राथमिक आरोग्य उपकेंद्र निर्माण करण्यात यावे.
		९.	शिरगांवात सरकारी दवाखाना नाही.		

तक्ता क्र. ३.५
पूरपरिस्थितीतील समस्या आणि सुचना (शासकीय वर्ग)

अ.क्र.	प्रशासकीय अधिकारी वर्ग	अ.क्र.	समस्या	अ.क्र.	सुचना
१.	तहसिलदार आणि उपविभागीय अधिकारी ता. वाळवा	१.	आपत्तीग्रस्त भागात व्यवस्थापन करीत असताना वेगवेगळ्या प्रशासकीय विभागामध्ये समन्वय निर्माण करणे हि कठिण समस्या आहे.	१.	पूरासंदर्भात दिर्घकालीन नियोजन करणे गरजेचे आहे.
		२.	धरणाचे बॅकवॉटर पूर येण्यास पूरक असल्याचे ही समस्या आहे.	२.	प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांच्यात समन्वय घडवून आणला पाहिजे.
		३.	पूरस्थितीची मर्यादा ओळखता न आल्याने लोकांच्या स्थलांतराचा प्रश्न निर्माण होतो.	३.	पूरपरिस्थिती उद्‌भवण्यापूर्वी योग्य ती दक्षता घेणे आवश्यक आहे.
		४.	पूरग्रस्तांचे स्थलांतर करताना यांत्रिक बोटींची संख्या कमी पडते.	४.	आपत्तकालीन कार्यामध्ये प्रशासकीय कर्मचारी, स्थानिक स्वयंसेवी संघटना, स्थानिक नागरीक आणि सहकारी संस्था यांचा सहभाग असणे आवश्यक आहे.
		५.	आपत्तीग्रस्तांना तातडीने आर्थिक आणि इतर मदत पुरविण्यात आली नाही.	५.	पूरव्यवस्थापना अद्ययावत संगणक प्रणाली राबविली पाहिजे.
		६.	शासकीय कार्यामध्ये सहभागाबद्दल नागरीक अजून पूरेसे जागरूक झालेले नाहीत.	१.	आपत्तकालीन परिस्थिती लोकांना पूरासंदर्भात जास्त माहिती देण्यात यावी.
				२.	अलमट्टी धरणातील विसर्गाचे व्यवस्थापन योग्य प्रकारे केल्यास पूराची तीव्रता कमी करू शकतो.
				३.	जास्तीत जास्त यांत्रिक साधनांना (मोटार बोटी) वापर करण्यात यावा.
२.	पाटबंधारे विभाग सांगली	१.	कोयनेचे प्रचंड पाणी वीज निर्मितीसाठी पूर्णपणे न वापरल्यामुळे वाहून जाऊन पूरपरिस्थितीची समस्या निर्माण होते.	४.	धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पर्यावरणाचा ऱ्हास रोखणे.
		२.	अतिवृष्टी काळात मुक्त पाणलोट व धरणातील विसर्गामुळे पुराचे प्रमाण वाढते ही फार मोठी समस्या आहे.	५.	पाणलोट क्षेत्रातील हिरवे अच्छादन कायम राहिल याची काळजी घेणे.
				६.	भूजलाच्या साठ्यात वाढ झाल्यास पूरसंकट रोखता येवू शकेल. शक्य त्या ठिकाणी छोटे बांधी, शेततळी बांधणे.

अ.क्र.	प्रशासकीय अधिकारी वर्ग	अ.क्र.	समस्या	अ.क्र.	सुचना
३.	एस.टी. व्यवस्थापक सांगली	१.	वाहतुकीसाठी पर्यायी रस्ता नाही, त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो.	१.	पूरापासून योग्यप्रकारे व्यवस्थापन करण्यासाठी रस्त्यांची उंची वाढविणे.
				२.	रस्ते डांबरीकरण करणे.
				३.	प्रत्येक एस.टी. चालकास रस्त्याचे नकाशे देण्यात आले पाहिजे.
				४.	पर्यायी वाहतूक व्यवस्थेची सर्व सुचना देण्यासाठी योग्य नियोजन करण्यात आले पाहिजे.
				५.	आपत्ती व्यवस्थापन संदर्भाचे नियोजन दिर्घकालीन असावे.
४.	सहाय्यक पोलीस निरीक्षक (वाहतूक) सांगली		--	१.	सर्व वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांकडे अत्याधुनिक साहित्य देण्यात आले पाहिजे.
५.	आरोग्य विभाग सांगली	१.	रूग्णवाहिका, शवपथके यांची संख्या कमी पडते.	१.	रूग्णवाहिका, शवपथकांच्या संख्येत वाढ करण्यात यावी.
		२.	पूरामुळे नदीकाठच्या गांवात पाणी शिरून त्या गावाशी होणारा संपर्क तुटतो त्यामुळे तेथील रहिवाशांना आरोग्यविषयक सुविधा पुरविण्यास विलंब होतो.	२.	पूरपरिस्थितीच्या समस्यांना तोंड देण्यासाठी शासकीय पातळीवर आरोग्यविषयक योग्य नियोजन करण्यात आले पाहिजे.
६.	गटविकास अधिकारी ता. वाळवा	१.	धरणातील पाणी जास्त प्रमाणात सोडल्यास पूरपरिस्थिती निर्माण होते.	१.	पूरनियंत्रणाच्या नव्हे तर पूर व्यवस्थापनाच्या दिशेने प्रयत्न झाले पाहिजेत.
		२.	अतिवृष्टी आणि वाढती लोकसंख्या ही पूर येण्याची कारणे आहेत.	२.	नद्यांच्या प्रवाहाची दिशा वळवून आणि विशिष्ट प्रकारचे बांधकाम करून पूर नियंत्रणात आणता येईल.
		३.	कृत्रिम पुरामध्ये पाण्याचा विसर्ग न झाल्यामुळे नुकसानीत वाढ होत जाते.		

अ.क्र.	प्रशासकीय अधिकारी वर्ग	अ.क्र.	समस्या	अ.क्र.	सुचना
		४.	नदीकिनाऱ्यावरील लोकांच्या आरोग्यावर दुषित पाण्याचा वाईट परिणाम होतो.		
७.	पंचायत समिती सभापती ता. वाळवा	१.	शासनाचे पूराबाबत नियोजनात्मक धोरण नसल्याने नुकसानीत वाढ होत आहे.	१.	शास्त्रीय दृष्टीने पूराचा अभ्यास करून पूर आपत्ती व्यवस्थापनाचे नियोजन करणे.
		२.	अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने आपत्तीला सामोरे जाताना अनेक समस्या निर्माण होतात.	२.	शहर नियोजनासाठी 'रेडझोन' निश्चित करणे.
		३.	यांत्रिक साहित्याची कमतरता आहे.	३.	पर्यावरण परिणामांचा अभ्यास एकात्मक रितीने करणे.

वरील समस्या आणि सुचना लक्षात घेऊन पूरपरिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासन आणि स्थानिक लोकांनी एकजूट होऊन कार्य केल्यास पूरापासून जिवीत आणि वित्तहानी तसेच इतर हानी बहुतांशी टाळण्यास मदत होईल.

याशिवाय पूरग्रस्त लोकांनी वाळवा आणि शिरगांव या दोन्ही गांवांतील पूरपरिस्थिती टाळण्यासाठी कांही वस्तूनिष्ठ सुचना दिलेल्या आहेत त्या खालील प्रमाणे आहेत.

१) वाळवा ते शिरगांवच्या मध्यभागी कृष्णा नदी वाहते यामुळे दोन्ही गावांना संपर्क साधण्यासाठी होडीतून प्रवास करावा लागतो. हा प्रवास धोकादायक आहे. यापासून मार्ग काढण्यासाठी दोन्ही गावांना जोडून पूल बांधण्यात यावा.

२) नागठाणे ते शिरगांव जो पूल आहे त्याची मजबूतीची कालावधी संपलेली आहे. म्हणून हा पूल फार धोकादायक ठरू शकतो म्हणून पर्यायी पूलाची बांधणी करण्यात यावी.

३) हाळभाग येथील पुलाची उंची वाढविणे.

संशोधक वाळवा गांवचे असल्याने पूरपरिस्थीची प्राथमिक माहिती आणि अनुभव आहे म्हणून खालीलप्रमाणे काही सुचना सुचविलेल्या आहेत.

१) वाळवा ते नवेखेड ओढ्यावरील पुलाची उंची वाढविणे.

२) वाळवा ते आष्टा जाणाऱ्या ओढ्यावरील पुलाची उंची वाढविणे.

३) वाळवा ते अहिरवाडी जाणाऱ्या ओढ्यावरील पुलाची उंची वाढविणे.

४) हाळभाग आणि कोटभाग या दोन्ही भागातील एकूण १० हजार लोकसंख्या असल्याने त्यांना पूरपरिस्थितीतून बाहेर येण्यासाठी दोन यांत्रीकी बोटी व दोन लाकडी होड्या अत्यावश्यक आहेत.

५) वाळवा या गावाला जोडणारे अनेक रस्ते कच्चे असून त्याचे खडीकरण किंवा डांबरीकरण करण्यात यावे.

६) शिरगांव ते बुर्ली या रस्त्याची उंची वाढविण्यात येऊन डांबरीकरण करण्यात यावे.

अधिकाऱ्यांनी सुचविलेल्या कांही सुचना खालील प्रमाणे आहेत.

१) राष्ट्रीय पूर आयोग (१९८०) ने आणि राष्ट्रीय एकात्मिक जलसंसाधन आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार धरणांच्या कार्यपद्धतीचे कालबद्ध मूल्यमापन केले जावे.

२) पूरस्थितीचा अंदाज घेणाऱ्या यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यात याव्यात.

३) पावसाचे प्रमाण आणि अंदाज या बाबतची माहिती भौगोलिक विभागानुसार संकलित करण्याऐवजी 'नदीखोरे' या निकषावर मिळविणे व वापर करण्यात यावी.

४) धरणाचा कार्यक्रम कार्यनिहाय नियम (Operation rules) अपवादात्मक परिस्थिती व पूर व्यवस्थापना विषयी माहिती व शिक्षण नागरिकांना देण्यात यावे.

संदर्भ सुची

१) वा. रं. अहिरराव – पर्यावरण विज्ञान, निराली प्रकाशन, १९९९.

२) Planning Commission Government of India, New Delhi, Five Year Plan, 2002-2007, Vol.-I, Page No. 189.

३) पाटील बी. बी. – लोकप्रशासन सिद्धांत आणि व्यवहार, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पान नं. ३२.

४) कित्ता – पान नं. ३२.

५) पाटील बी. बी. – लोकप्रशासन, फडके प्रकाशन, कोल्हापूर, नोव्हेंबर २००६, पान नं. १८९.

६) Department of Relief and Rehabitation, Yashda, Pune – 2007.

७) N. S. Gaikwad – "Production and Marketing of Raisins in Sangli District" Ph.D., April-2007, Shivaji University, Kolhapur.

८) कित्ता – वरील प्रमाणे.

९) तहसिल कार्यालय, इस्लामपूर – २००७.

१०) उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग – २००७.

११) उपअभियंता, पाटबंधारे विभाग, सांगली – २००७.

१२) एस.टी. व्यवस्थापकीय विभाग, सांगली – २००७.

१३) पोलीस निरीक्षक (वाहतूक), सांगला – २००७.

१४) वैद्यकीय अधिकारी, सांगली – २००७.

१५) गटविकास अधिकारी, (ता. वाळवा) – २००७.

१६) नगरपालिका मुख्य अधिकारी, (ता. वाळवा) – २००७.